दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.१ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २१३ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 1 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 213 | Pages 4 | Rate 4 Rs


### माझा विलीनीकरणाला विरोध नव्हता

**मुंबई**–दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणासंदर्भात माहिती मला होते. त्याला माझा विरोध नव्हता, असा खळबळजनक खुलासा सुनील तटकरे यांनी केला आहे. अजितदादा असताना आणि नसताना होणाऱ्या विलीनीकरणात खूप फरक आहे. विलीनीकरण करू पण सुनेत्रा वहिनींना नेता निवडा, असे शरद पवार गटातील कोणी म्हटले नाही, असेही त्यांनी म्हटले.अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाबाबतच्या चर्चांनी जोर धरला होता. दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण व्हावे, अशी अजित पवारांची अंतिम इच्छा होती. दोन्ही पक्षाचे विलीनीकरण अंतिम टप्प्यात आले होते. दोन्ही गटातील नेत्यांच्या काही बैठकींचे व्हिडिओ आणि फोटो देखील समोर आले होते. हे व्हिडिओ विलीनीकरणासंदर्भातील बैठकीचेच असल्याचे सांगण्यात आले होते. यावर सुनील तटकरे यांनी प्रथमच उघडपणे भूमिका मांडली.

# आखाती देशांतील युद्धामुळे महाराष्ट्रात खतांचा तुटवडा

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या संघर्षाचे पडसाद आता महाराष्ट्राच्या बांधापर्यंत पोहोचले आहेत. या युद्धामुळे आखाती देशांशी होणारा आंतरराष्ट्रीय व्यापार विस्कळीत झाल्याने याचा सर्वाधिक फटका खतनिर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठ्याला बसला आहे. परिणामी, भविष्यात राज्यात युरियाचा मोठा तुटवडा भासण्याची शक्यता कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केली. या संकटाचा सामना करण्यासाठी आतापासूनच नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत.आखाती देशांतील युद्धामुळे शेतीमालाच्या आयात-निर्यातीवर १०० टक्के परिणाम झाला. भारताचा मोठा शेतीमाल या देशांमध्ये निर्यात होतो; मात्र सध्या हा मार्ग ठप्प झाल्याने राज्यातील बाजारपेठांमध्ये मालाची आवक वाढली आणि भाव कोसळले आहेत. याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला बसत आहे. निर्यात थांबल्याने स्थानिक बाजारात भाव पडले आहेत. खत निर्मितीच्या कच्च्या मालावर परिणाम झाल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते, असे भरणे यांनी स्पष्ट केले.राज्यातील हवामान बदलाबाबत सतर्क करताना कृषी मंत्र्यांनी सांगितले की, १७ एप्रिलनंतर तापमानात मोठी वाढ होण्याचा अंदाज आहे. ऑगस्ट महिन्यापर्यंत पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता असल्याने जलसंकटाची चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.



### पंचनाम्यानंतर तातडीने मदत

**राज्यात अलीकडेच झालेल्या अवकाळी पावसामुळे अनेक भागांतील पिकांचे मोठे नुकसान झाले. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. प्रशासनाकडून अंतिम अहवाल प्राप्त होताच बाधित शेतकऱ्यांसाठी नुकसान भरपाई जाहीर केली जाईल, असे आश्वासनही कृषी मंत्र्यांनी यावेळी दिले.**

## उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांच्या तत्परतेमुळे माजलगावचा पाणी पुरवठा सुरळीत

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । उफाडे मच्छिंद्र**

शहरातील जलशुद्धीकरण केंद्रात अचानक उद्भवलेल्या तांत्रिक बिघाडामुळे विस्कळीत झालेला पाणी पुरवठा माजलगाव नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांच्या सक्रिय हस्तक्षेपामुळे अवघ्या काही तासांत सुरळीत झाला आहे. शब्दांपेक्षा कृतीवर भर देत त्यांनी स्वतः उभे राहून दुरुस्ती काम पूर्ण करून घेतल्याने शहरवासीयांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.तांत्रिक बिघाडामुळे नागरिक झाले होते हैराण मागील काही दिवसांपासून जलशुद्धीकरण केंद्रातील मुख्य मोटरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने अनेक भागांचा पाणी पुरवठा ठप्प झाला होता. ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर पाणी नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. ही बाब समजताच उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांनी कोणतीही प्रतीक्षा न करता थेट जलशुद्धीकरण केंद्रावर धाव घेतली. केवळ सूचना देऊन न थांबता, सहाल चाऊस यांनी तांत्रिक कर्मचाऱ्यांसोबत राहून बंद पडलेली मोटर दुरुस्त करून घेतली. स्वतः उपस्थित राहून त्यांनी कामाचा पाठपुरावा केला आणि तांत्रिक अडथळे दूर केले. त्यांच्या या तत्परतेमुळे पाणी पुरवठा यंत्रणा पुन्हा कार्यान्वित झाली असून शहरात पाणी पोहोचू लागले आहे.यावेळी बोलताना उपनगराध्यक्ष सहाल चाऊस म्हणाले की, नागरिकांची गैरसोय होणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला मान्य नाही. लोकसेवा हीच ईश्वर सेवा मानून आम्ही काम करतो. तांत्रिक बिघाड झाला होता, मात्र त्यावर तातडीने उपाययोजना करून पाणी पुरवठा सुरळीत करणे हे आमचे प्रथम कर्तव्य होते.

**झेंडा चौक भागात गेल्या १०-१२ दिवसांपासून पाणी सुटले नव्हते, कारण फिल्टरची मोटार खराब झाली होती. तत्पर उपगराध्यक्ष सहाल भैया चाऊस यांनी स्वतः फिल्टरवर जाऊन बंद पडलेल्या मोटारचे काम करून घेतले आहे. आज किंवा उद्यापासून पाणी पुरवठा सुरळीत होईल, याची नागरिकांनी दक्षता घ्यावी.**
**– रोहन घाडगे (माजी नगरसेवक)**



## खा.रजनीताई पाटील यांनी घेतली खा.शरद पवार यांची सदिच्छा भेट



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

देशाचे नेते,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख खा.शरद पवार यांची मुंबई येथील निवासस्थानी जाऊन काँग्रेसचे नेत्या खा रजनीताई पाटील यांनी मंगळवार रोजी सदिच्छा भेट घेतली.यावेळी भेटी दरम्यान विविधविषयावर चर्चा झाली.महाराष्ट्रातील राजकारण,समाजकारण अशा विषयावर सविस्तर चर्चा झाली.देशातील, महाराष्ट्रातील सामान्य जनता विविध संकटाचा सामना करत आहे. महागाई बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न उभे आहेत.विविध योजना लोकांपर्यंत पोहचत नाहीत.विरोधी पक्षांचा आवाज दाबला जात आहे यांसह राजकिय विषयावर चर्चा झाली

यावेळी समवेत काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस आदित्य दादा पाटील हे उपस्थित होते.

## तुकूचीवाडी येथे खंडोबा मंदिर उभारणीचे मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

दि.३० मार्च २०२६ सोमवार रोजी केज तालुक्यातील तुकुचीवाडी येथे खंडोबा देवस्थानच्या मंदिराचे भूमिपूजन या भागाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत भैया मुंडे यांच्या शुभहस्ते व ह.भ.प.श्री.अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामस्थांन समवेत करण्यात आले. गावकऱ्यांनी लोक सहभागातून खंडोबा देवस्थान मंदिर उभारण्याचा पुढाकार घेतला असून तुकूचीवाडी गावात भव्य दिव्य असे मंदिर होणार असल्याने गावाच्या वैभवात भर पडणार असल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाल्याचे दिसून आले.या वेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंजरथ वाळू घाटावर अवैध उपसाचा कहर; प्रशासन झोपेत?

### नियम कागदावरच, घाटावर मशिनरीचा उच्छाद!

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । उफाडे मच्छिंद्र**

माजलगाव तालुक्यातील मंजरथ वाळू घाटावर सुरू असलेल्या अवैध वाळू उपसाने गंभीर स्वरूप धारण केले असून महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. शासनाच्या नियमांना धाब्यावर बसवत मजुरांऐवजी पोकलेन, जेसीबीसारख्या अवजड मशिनरीच्या साह्याने दिवस-रात्र मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू असल्याचे चित्र आहे.शासनाच्या नव्या वाळू धोरणानुसार घाटावरून वाळू उपसा हा केवळ मजुरांच्या माध्यमातूनच करणे बंधनकारक असताना मंजरथ घाटावर मात्र याउलट परिस्थिती दिसून येत आहे. अवजड मशिनरीच्या वापरामुळे शेकडो



ब्रास वाळू उपसली जात असून ट्रॅक्टर व हायवा वाहनांची सततची वर्दळ सुरू आहे. त्यामुळे नदीपात्राची अक्षरशः चाळण होत असून पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत.या प्रकारामुळे स्थानिक मजुरांच्या रोजगारावरही गदा आली असून त्यांना कामापासून वंचित राहावे लागत आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घाटावर पारदर्शकता राखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक असताना, मंजरथ घाटावरील कॅमेरे प्रत्यक्ष उत्खनन क्षेत्राऐवजी भलत्याच दिशेला वळविण्यात आल्याचे समोर आले आहे. हा तांत्रिक बिघाड आहे की जाणीवपूर्वक केलेली 'सेटिंग', याबाबत परिसरात चर्चांना उधाण आले आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन सुरू असताना तहसीलदार रुईकर, उपविभागीय अधिकारी इंगोले किंवा संबंधित महसूल अधिकाऱ्यांना याची माहिती नसावी, यावर नागरिकांचा विश्वास बसत नाही. त्यामुळे प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे.नदीपात्र उद्ध्वस्त होत असताना प्रशासन गप्प का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. गोदावरी नदीच्या पर्यावरणावर याचा विपरीत परिणाम होत असून तातडीने कारवाईची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून प्रत्यक्ष पाहणी करावी व दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थ व नागरिकांकडून होत आहे.

## माजलगावात महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरात भगवान महावीरांचा जन्म कल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प.पू.आचार्य मुनी श्री पवित्रसागरजी महाराज व मुनी श्री प्रशांतसागरजी महाराज यांची विशेष उपस्थिती लाभली.

महोत्सवानिमित्त शहरातील झेंडा चौक येथील जैन मंदिरातून सकाळी ९ वाजता भव्य मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. ही मिरवणूक डॉ. आंबेडकर चौक, शिवाजी महाराज चौक मार्गे पुढे जात राजस्थानी मंगल कार्यालय येथे विसर्जित झाली. मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत भगवान महावीरांच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय केले.

यावेळी मुनी श्री पवित्रसागरजी महाराज यांनी जैन धर्म व भगवान महावीरांच्या शिकवणीवर मार्गदर्शनपर प्रवचन देत अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमादरम्यान समाजातील चिमुकल्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त माजलगाव ब्लड सेंटर यांच्यावतीने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते, ज्याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी परिश्रम घेतले.



# संपादकीय

## ज्येष्ठांभोवतीचा सायबर सापळा

ज्येष्ठ नागरिकांची ऑनलाइन फसवणूक हे आजच्या घडीचे भीषण सामाजिक संकट झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या वेगवान बदलांमध्ये मागे राहिलेला हा वयोगट गुन्हेगारांसाठी सर्वांत मोठा 'सॉफ्ट टार्गेट' ठरत आहे. यामागील कारणांचा शोध घेतला, तर सर्वांत ठळक बाब दिसून येते ती, यांच्याकडे असलेला निवृत्तीनंतरचा पैसा आणि तंत्रज्ञानाबद्दले अज्ञान. ज्येष्ठ नागरिक आपल्याला स्मार्ट मोबाइल सहजतेने हाताळताना दिसत असले, तरी सोशल मीडिया कसा वापरायचा, एकूणच मोबाइल वापराचे 'डूज अँड डोन्ट्स' याची त्यांना पुरेशी माहिती नाही. त्यांच्याकडे 'माध्यम साक्षरता' नाही, डिजिटल सुरक्षेचे प्रशिक्षण नाही.तंत्रज्ञानामध्ये भराभर जे काही बदल होत आहेत, त्या बदलांना जुळवून घेण्याच्या नादात त्यांच्याकडून अनेक चुका होतात. त्यातल्या प्रकर्षाने दिसणाऱ्या गोष्टी म्हणजे, सोशल मीडियावरील पोस्ट भराभर एकमेकांना फॉरवर्ड करणे आणि सोशल मीडियावरील गोष्टींवर चटकन विश्वास ठेवणे. जे कुठेतरी छापलेले आहे त्यावर विश्वास ठेवला पाहिजे, असा त्यांचा समज आहे. त्यामुळे आपल्याकडील कंन्टेंट तपासून पाहिले पाहिजे, विचारले पाहिजे किंवा या फसवणुकीच्या गोष्टी असू शकतात, याची जाणीव त्यांना नसते. आणि इथेच गुन्हेगारांचे फावते.

ज्येष्ठ नागरिकांबाबत घडणाऱ्या ऑनलाइन फसवणुकीत 'डिजिटल रेस्ट' हा सर्वांत भयावह प्रकार आहे. पोलिस, सीबीआय, कस्टम, रिझर्व्ह बँक आदी सरकारी संस्थांबद्दल आधीच सर्वसामान्यांच्या मनात एक भीती असते. हे सायबर गुन्हेगार नेमक्या याच नावांचा वापर करून ज्येष्ठांना भीती दाखवतात. त्यातच ईडीसारख्या संस्थेची तर दहशतच अलीकडच्या काळात निर्माण झाली आहे. ही संस्था काहीही करू शकते, कोणालाही अटक करू शकते, हे लोकांनी अनुभवले आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक या बनावाला बळी पडतो.'डिजिटल रेस्ट'बरोबरच त्यांच्यासोबत वेगवेगळे गुंतवणूक घोटाळेदेखील होत आहेत. त्यामध्ये या ज्येष्ठ नागरिकांना गुंतवून त्यांच्याकडून पैसे ट्रान्सफर करून घेणे हा त्यातला एक महत्त्वाचा भाग आहे. निवृत्तीनंतर आलेल्या पैशांबाबतचा डेटा अनेक ठिकाणी लीक होतो, हे येथे लक्षात घ्यायला हवे. यात आणखी एक गोष्ट जाणवते ती म्हणजे, अलीकडच्या काळात जे मोठे घोटाळे झालेले आहेत; त्यांचा या फसवणुकीसाठी वापर केला जातो. उदा. जेट एअरवेज बंद झाली, त्यात काय घोटाळे झाले, त्यातील व्यक्तींच्या नावांचा वापर करून, 'या घोटाळ्यामधले काही पैसे तुमच्या अकाउंटला आले आहेत. म्हणून तुमचे खाते आम्हाला गोठवावे लागत आहे.' किंवा 'सोशल मीडियावर तुम्ही मुलांबाबतचा लैंगिक कंन्टेंट पाहिला आहे आणि त्याचे पुरावे आमच्याकडे आहेत. त्याबद्दल तुम्हाला अटक होऊ शकते,' अशी भीती दाखवल्यामुळे लोक घाबरून जातात.अशा प्रकरणांत ज्येष्ठांना तशी भीतीच घातली जाते. ही गोष्ट तुम्ही कोणालाही, अगदी तुमच्या मुलांनाही कळवली, तरी तुमच्यासोबत तुमच्या मुलांनाही आम्ही अटक करू. 'तुमच्या सर्व कुटुंबाला यातून धोका आहे,' असे सांगून त्यांना सतत कॅमेऱ्यासमोर बसवून ठेवले जाते. एक अशीच केस आमच्याकडे आली होती. त्यात नवरा-बायको दोघेही ज्येष्ठ नागरिक होते. महत्त्वाचे म्हणजे ते व्यावसायिक होते. जवळपास साडेसहा कोटी रुपये त्यांनी समोरच्या व्यक्तीला दिले. आपली होती नव्हती ती मालमत्ता विकून त्यांनी पैसे दिले. स्कॅम्समधून तुमच्या बँक खात्यात काही पैसे आले आहेत, असे समोरच्या व्यक्तीने सांगितले होते. त्याने यासाठी सांगितलेल्या रकमादेखील खऱ्या होत्या.'कारवाई टाळायची असेल, तर हे पैसे तुम्हाला आत्ताच्या आत्ता ट्रान्स्फर करावे लागतेल. ते पैसे ट्रान्सफर केल्यानंतर हे सगळे प्रकरण मिटवण्यासाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील. नाही तर तुमच्या परदेशात असेल्या मुलाला आम्हाला यात गुंतवावे लागेल. त्याचा व्हिसा रद्द होईल. आम्ही आंतरराष्ट्रीय स्तरावर ही माहिती जाहीर करू,' अशा धमक्या त्यांना दिल्या. त्यामुळे त्यांनी ही गोष्ट कुणालाच सांगितली नाही. आणि शेवटी अशी परिस्थिती आली की द्यायला पैसेच उरले नाहीत. त्यानंतर त्यांनी ही गोष्ट मित्राला सांगितली. तेव्हा हे प्रकरण 'डिजिटल रेस्ट'चे असल्याचे समजले. त्यानंतर ते पोलिसांकडे गेले. तिथून ही केस आमच्याकडे आली. आम्ही त्यांना मदत केली, समुपदेशन केले. पोलिसांकडून काही रक्कम गोठवण्यात आली, पण ती फारच तोकडी आहे. ज्येष्ठ नागरिकांना भीती दाखवली जाते. अनेकांनी आम्हाला सांगितले की त्यांना हिप्नोटाइज झाल्यासारखे झाले. गुन्हेगार सतत मोबाइल किंवा लॅपटॉप सुरू ठेवायला सांगतात. त्यांच्यासमोर बसून ठेवले जाते. जेवायलासुद्धा त्यांच्यासमोर बसण्याचा आग्रह केला जातो. त्याबाबत कुणाला कळवले तर सगळी बँक खाती गोठवण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे लोक घाबरून जातात.लोकांमध्ये जागृती व्हावी यासाठी सरकारकडून प्रयत्न होत आहेत. सर्व माध्यमांत यासंदर्भातल्या बातम्याही येत असतात. मध्यंतरी सरकारने मोबाइल फोनच्या कॉलिंगमध्येसुद्धा याबाबतची ऑडिओ टेप लावलेली होती. तरीसुद्धा घटना थांबलेल्या नाहीत. आपण 'डोअर टू डोअर' कशा पद्धतीने जाऊ शकतो, सूक्ष्म पातळीवर कशा पद्धतीने योजना आखू शकतो, यावर सरकारने विचार करायला पाहिजे. कारण यातून लोकांचे जाणारे पैसे हे प्रचंड आहेत. आपण त्याकडे बघताना केवळ आर्थिक नुकसान बघतो, पण त्या लोकांचे आयुष्य पूर्ण उद्ध्वस्त होते. त्यांच्या मानसिक आरोग्यावरही प्रचंड परिणाम झालेला असल्यास या धक्क्यातून बाहेर येणे कठीण आहे. काही लोकांची आयुष्यभराची प्रॉपर्टी, पैसे गेलेले असतात. पुढे जगायचे कसे हा प्रश्न त्यांच्यापुढे असतो.छोटे छोटे विभाग टार्गेट करून त्याचा पोलिसांनी, तिथल्या सामाजिक संस्था, शाळा-कॉलेजांनी हे सगळे नीट योजनाबद्धतेने केले, तर आपण लोकांपर्यंत पोहोचू शकतो. असा एक उपक्रम आम्ही मुलुंडमध्ये केला होता. त्यातून ६७-६८ प्रकरणे पुढे आली. या प्रकरणांमध्ये तक्रारच दाखल झालेली नव्हती. लोक फसवले गेल्यानंतरही तक्रार करायला पुढे येत नाहीत; कारण त्यांना 'रिव्हिक्टिमायजेशन'ची भीती वाटत असते. म्हणजे, जेव्हा आम्ही पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी जातो, तेव्हा आम्हालाच बोल लावला जातो. 'तुम्ही सुशिक्षित आहात, तुमच्या हातून हे कसे काय घडलं?' अशी उलटतपासणी सुरू होते. त्यामुळे फसवले गेलेले ज्येष्ठ नागरिक पोलिसांकडे तक्रार करायला बिचकतात. ही गोष्ट उघड होते आणि मुलांपर्यंत जाते, तेव्हा मुलेच त्यांना सांगतात, 'पोलिस ठाण्यात जाऊ नका. नुकसानीने पैसे परत मिळणार नाहीत. उलट तुम्हाला पोलिस ठाण्यात वारंवर चकरा माराव्या लागतील.'याबाबत आत्ता जे काम सुरू आहे ते खूपच वरवरचे आहे. तसे ते काम न करता त्याची मूळ कारणे काय आहेत, हे कुठून होते आहे, का होते आहे, हे करणारे लोक कोण आहेत, टार्गेट असलेल्या लोकांना यांच्या तावडीतून वाचवण्यासाठी काय केले पाहिजे, यावर पूर्ण विचार करून त्याचा व्यवस्थित 'अॅक्शन प्लॅन' करू शकलो, तरच त्याचा फायदा होऊ शकेल. अन्यथा हे असेच सुरू राहील. या गुन्हेगारांची गुन्ह्याची पद्धत सतत बदलत असते. त्यांचे निरनिराळे स्कॅम येत असतात. काहीतरी नवीन गोष्टी पुढे आणल्या जातात. तत्कालिक काही गोष्टींचाही यासाठी वापर केला जातो. उदा. युद्धजन्य परिस्थितीत तुम्हाला जास्त सिलिंडर हवेत का? अमुक गोष्टी हव्यात का, याच्यासाठी कॉल करून लोकांना फसवले जाते.

# पात्रुड येथील माळी गल्ली हनुमान चौकात हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन

## पंचक्रोशीतील भजनी मंडळ व भाविकांना उपस्थितीचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**


**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पात्रुड येथील माळी गल्ली, हनुमान चौक येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या निमित्ताने रात्रभर भजनाचा जागर आणि भव्य अन्नदान सोहळा संपन्न होणार आहे. या मंगलमयी सोहळ्यासाठी गावातील सर्व भजनी मंडळ आणि हनुमान भक्तांना उपस्थित राहण्याचे कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे.

भागवत भुजबळ यांच्या नेतृत्वात भजनाचा जागर

कार्यक्रमाची सुरुवात १ मार्च रोजी रात्रीपासून होणार असून, या भजनाचे नेतृत्व प्रसिद्ध भजनी भागवत भुजबळ करणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रभर भक्तीमय वातावरणात गावातील सर्व भजनी मंडळाच्या वतीने विठ्ठल-नामाचा गजर आणि हनुमान चालीसाचे पठण केले जाईल. २ मार्च रोजी पहाटे ५ वाजल्यापासून प्रत्यक्ष हनुमान जन्माच्या वेळेपर्यंत अखंड भजन सुरू राहणार आहे. या भक्ती सोहळ्यात गावातील सर्व भजनी मंडळांनी आपल्या टाळ-मृदंगाच्या गजरात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.हनुमान जन्माचा सोहळा संपन्न झाल्यानंतर सकाळी सर्व भाविकांसाठी अंजली किराणा व जनरल स्टोअर्स यांच्या सौजन्याने भव्य 'अन्नदान' (महाप्रसाद) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

माळी गल्ली हनुमान चौक मित्र मंडळाच्या वतीने या सोहळ्याचे नेटके नियोजन करण्यात आले आहे. पात्रुड परिसरातील सर्व हनुमान भक्तांनी आणि ग्रामस्थांनी या भक्ती सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामुळे संपूर्ण माळी गल्ली आणि हनुमान चौक परिसरात सध्या उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.



# मुंबईत रिपब्लिकन सन्मान सभेची सहावी विभागीय बैठक

## राज्यभरातील पदाधिकाऱ्यांना उपस्थितीचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**

**परळी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात कार्यरत असलेल्या रिपब्लिकन सन्मान सभेच्या वतीने एप्रिल महिन्यात मुंबई येथे सहाव्या विभागीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, पत्रकारिता आणि क्रीडा क्षेत्रात कार्य करणाऱ्या या संघटनेच्या माध्यमातून राज्यात नव्या सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभारण्याचा प्रयत्न सुरू आहे.ही बैठक संघटनेचे राष्ट्रीय मुख्य समन्वयक तथा दैनिक 'परळी सन्मान'चे मुख्य संपादक प्रा. डॉ. दशरथ वैजनाथ रोडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून, राज्य सल्लागार मा. सिद्धार्थ तलवारे मार्गदर्शन करणार आहेत.

संघटनेच्या माध्यमातून महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब भिमराव आंबेडकर यांच्या विचारांची जनजागृती करून सामाजिक क्रांती घडवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे. गेल्या तीन वर्षांत संघटनेने राज्यातील पाच विभागांत आपले जाळे निर्माण केले असून युवकांना मार्गदर्शन व संघटन बांधणीवर विशेष भर दिला आहे.

मराठवाडा, विदर्भ, खान्देश, कोकण व उत्तर महाराष्ट्र या पाचही विभागांतील पदाधिकाऱ्यांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

संघटनेच्या आतापर्यंतच्या कार्याचा आढावा घेतला असता, पहिल्या टप्प्यात नागसेन भूमीतून मराठवाडा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यानंतर विदर्भ, खान्देश, कोल्हापूर येथे विभागीय बैठका पार पडल्या. पाचवी बैठक कोकणातील महाड परिसरात पार पडली होती. आता अंतिम सहावी विभागीय बैठक मुंबईत होणार असून, यामध्ये विभागीय व जिल्हास्तरीय कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार आहे.

या बैठकीस राज्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व सभासदांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. डॉ. दशरथ रोडे यांनी केले आहे.



# रेवदंड्यात महिला सक्षमीकरणाचा नवा संदेश

## पोलीस-माविम बैठकीत मान्यवरांचा गौरव

**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाण्यात पोलीस व माविम मित्र मंडळ यांची संयुक्त बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सहायक पोलिस निरीक्षक बी. के. जाधव होते.बैठकीदरम्यान माविमच्या व्यवस्थापक शमीन चौधरी यांनी महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देत, त्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर सविस्तर प्रकाश टाकला. विधी सेवा प्राधिकरणाच्या स्वयंसेविका वैशाली यांनी महिलांना कायदेशीर अडचणींसाठी दर शनिवारी रेवदंडा पोलीस ठाण्यात मोफत सल्ला व वकिलांचे मार्गदर्शन उपलब्ध असल्याचे सांगून या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.महिला पोलीस हवालदार संजिवनी म्हात्रे यांनी महिलांनी आर्थिक व्यवहार करताना सजग व डोळसपणे निर्णय घेण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी एपीआय श्री. जाधव यांनी महिलांनी छोटे-मोठे व्यवसाय सुरू करून आर्थिक सबलीकरण साधावे, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती करून घेत त्यांचा लाभ घ्यावा, असे मार्गदर्शन केले. घरच्या घरी करता येणाऱ्या उद्योगांची संधी ओळखून त्यासाठी मानसिक तयारी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, तरुण पिढी वाढत्या व्यसनाधीनतेकडे झुकत असल्याबद्दल चिंता व्यक्त करत, शारीरिक व मानसिक सक्षमता वाढवण्यासाठी पालकांनी जागरूक राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.यावेळी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक तथा माजी एसीपी (ठाणे वाहतूक शाखा) रमेश लक्ष्मण धाटावकर (रेवदंडा) व सेवानिवृत्त शिक्षक प्रकाश प्रभाकर पाटील (सागमळा, चौल) यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शेवटी प्रकाश पाटील यांनी माविमच्या कार्याचे कौतुक करत, महिला सक्षमीकरणासाठी पुरुषांनीही सहकार्य करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला ओम साई प्रेरणा साधन केंद्राच्या उपाध्यक्षा शलाका राऊत, कोषाध्यक्षा सुनित्रा भुर्के यांसह इतर समन्वयक उपस्थित होते.




# भिगवण बाजारपेठेत हापूस आंब्याचे आगमन

## पहिली पेटी तब्बल १४ हजारांना विक्री

**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । प्रतिनिधी**

भिगवण येथील बाजारपेठेत रत्नागिरी-देवगड हापूस आंब्याच्या पेट्यांचे आगमन झाले असून, यंदा तब्बल एक महिना उशिराने हापूस दाखल झाल्याने आंबाप्रेमींमध्ये उत्सुकता वाढली आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांमध्ये हापूस आंबा लवकर उपलब्ध होत असला, तरी ग्रामीण भागात तो उशिरा येत असल्याचे चित्र यावेळीही दिसून आले.फळांचा राजा म्हणून ओळख असलेल्या हापूस आंब्याला यंदा हवामानातील बदलांचा मोठा फटका बसला आहे. नोव्हेंबरपर्यंत झालेल्या पावसामुळे कलमांना उशिरा पालवी फुटली, मोहरही उशिरा आला. त्यानंतर पडलेल्या कडाक्याच्या थंडी व धुक्यामुळे मोहरावर परिणाम झाला. तसेच थ्रिप्सच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. सुरुवातीला ८० ते ९० टक्के मोहर लागला असला तरी प्रत्यक्षात यंदा केवळ २० टक्केच उत्पादन उपलब्ध होणार असल्याची माहिती गणपतीपुळे (मालगुंड) येथील बागायतदार विद्याधर पुसाळकर यांनी दिली.

दरम्यान, भिगवण येथील आंबा व्यावसायिक संतोष सोनवणे यांच्या दुकानात हापूस आंबा पेटी पूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी पहिली पेटी तब्बल १४,००० रुपयांना ज्योती हॉटेलचे चंद्रशेखर पवार यांनी खरेदी केली. दुसरी पेटी डॉ. संजय भोसले, तिसरी पेटी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती पराग जाधव, चौथी पेटी दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक रामदास झोळ, पाचवी पेटी पंचरत्न हॉटेलचे अविनाश गोलांडे, तर सहावी पेटी महेंद्र भोगावत यांनी समान दरात खरेदी केली.

पेटीचे पूजन चंद्रशेखर पवार, पराग जाधव, सरपंच गुरप्पा पवार, जवाहर रायसोनी, तुकाराम बंडगर, बापूराव थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परिसरातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत चवरे यांनी केले.



# शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांनी सोडली रयत क्रांती संघटनेची साथ

## शिवसेनेच्या माध्यमातून फोडणार शेतकऱ्यांच्या प्रश्न वाचा

**दैनिक वादळ वार्ता**


**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात शेतकरी चळवळीच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. संघटनेतील आक्रमक, अभ्यासू आणि प्रत्येक आंदोलनात अग्रभागी असणारे राज्य प्रवक्ते तथा बीड जिल्हा अध्यक्ष शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांच्या नेतृत्वात समस्त बीड जिल्हा कार्यकारिणी तसेच महाराष्ट्रातील सतरा जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यकर्त्यांसह शेतकरी कष्टकरी हितासाठी संघटनेतून बाहेर पडत विकासाचा म्हणजे शिवसेनेचा मार्ग धरला. याच पार्श्वभूमीवर राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी प्रा.एन डी चौघुले व शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांच्या नेतृत्वात एकत्रितपणे शिवसेनेत प्रवेश केला आहे.या प्रवेशामध्ये मराठवाडा व विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रात कार्यकर्त्यांचा ओघ वाढला आहे. या मोठ्या प्रवेशामुळे शिवसेनेला मोठे बळ मिळाले असून राज्यात तरुण तर्फडदार चळवळीच्या कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार झाली असून, राज्यातील शेतकरी संघटनांच्या राजकारणात नवे वळण मिळाले आहे. शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांनी रयत क्रांती शेतकरी संघटनेतील महाराष्ट्र राज्य प्रवक्ते तसेच बीड जिल्हा अध्यक्ष म्हणून अत्यंत प्रभावी भूमिका बजावत होते. प्रत्येक आंदोलनात अग्रभागी राहून त्यांनी संघटनेला बळ दिले होते. आक्रमक भूमिका, अभ्यासू दृष्टीकोन आणि कार्यकर्त्यांशी थेट संपर्क यामुळे ते संघटनेतील स्फोटक व प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. त्यांनी पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेची निवडणूक लढवण्याची तयारी ही सुरू होती.यांच्या संघटनेतील कार्याचा आणि बांधणीचा शिवसेनेला नक्कीच फायदा होईल.

# श्री क्षेत्र भगवानगडाचा ९२ वा नारळी सप्ताह

संत महापुरुषांचं एकत्रीकरण म्हणजे अखंड हरिनाम सप्ताह. विचारांची देवाणघेवाण, तत्त्वज्ञानावर चर्चासत्र, अनेक महापुरुषांना अभिप्राय व्यक्त करण्याचे व्यासपीठ. सामान्यांचे एकत्रीकरण, एकत्र जेवण, निर्व्यसनीपणाचे प्रशिक्षण, जीवनाविषयी गंभीरता, ईश्वराविषयी प्रेम, जीवन आणि संसाराची अनित्यता, सुखदुःखाची जाण, स्वतः विषयीचे ज्ञान व जगण्याचं भान देणारा हा अखंड हरिनाम सप्ताह असतो. संतांच्या ग्रंथांचे न समजणारे सिद्धांत इथे समजावून सांगितले जातात. भारताचा इतिहास व संस्कृतीचे विवेचन केले जाते. ऋषींचं मत व साधूंचं मनोगत इथे आचरणात आणण्याचे शिकविले जाते. आरोग्याची काळजी व योग प्रशिक्षण यात दिलं जातं. देव, भक्त व नाम ही त्रिवेणी म्हणजे नाम सप्ताह होय. इथे वाल्याचा महर्षी वाल्मीक होतो. हीच संतांची प्रतिज्ञाही आहे.

सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येकाला अधिकाराप्रमाणे आचरणाची मुभा दिली जाते. जात, पात, धर्म हे वारकरी संप्रदायात पहिल्यापासून नाहीत. इथे जो देवावर प्रेम करतो, तीच एक जात मानली जाते. स्त्री आणि पुरुष हा भेद नाही. इथे कोणत्याही अभंगावर विश्लेषणे होतात. श्री संत सावता महाराज, श्री संत चोखोबाराय महाराज, श्री संत सेना महाराज, श्री संत गोरोबाकाका, श्री संत नरहरी महाराज, श्री संत नामदेव महाराज, श्री संत लतीफ शाह, श्री संत सजन कसाई हे सर्व एकतत्त्वाचे व एकमताचे आहेत. त्यांची जात व धर्म कोणता आहे हे पाहिलं जात नाही. नैतिक आचरण, त्याग व ईश्वराविषयी प्रेम हेच सिद्धांत महत्त्वाचे आहेत. धर्मांधता नको; पण अंतकरण मोठं पाहिजे. उदारता पाहिजे. दिखाऊ प्रेम नको; देखणं प्रेम पाहिजे. त्याग






हा बोलण्यात नसून वागण्यात दिसला पाहिजे. स्वतःचं अस्तित्व वाढविण्यासाठी हा सप्ताह नाही. अपितु संप्रदायाचा, संतांचा प्रचार व प्रसार यासाठी हा नामसप्ताह असतो. चांगल्याचा, चांगल्यासाठी मेळावा आहे. या संत सभेत जर संतांपुढे गीता सांगण्याचा योग आला तर त्याला ईश्वर साक्षात्कार होतो. साक्षात्कारापेक्षाही तो देवाचा आवडता होतो.

तैसा भूतळी आघवा श्र आन न देखे पांडवा श्रश्र जो
गीता सांगे मेळावा श्र भक्तजनांचा श्रश्र
(ज्ञानेश्वरी १८-१५१६)
मग तयाचेनि पाडे श्र पडियंते मजपुढे श्रश्र नाहीचि
गा मागेपुढे श्र न्याहाळीता श्रश्र
(ज्ञानेश्वरी १८-१५२२)

हा सप्ताह विधिपूर्वक होत असतो. पहाटे काकडा भजन असते. हे अभंग स्वतंत्र आहेत. या अभंगाला काकड्याचे अभंग व भूपाळ्या असे नाव आहे. या अभंगात जीवनाचे व भगवंताचे विशिष्ट पद्धतीचे वर्णन वेगळ्या छंदातून व चालीतून असते. पहाटे मन शांत असताना कोणता विचार मनात असावा, हा विचार करून हे अभंग तयार झाले आहेत. यानंतर सर्वांसाठी ज्ञानेश्वरी पारायण. साधारणतः पंधराशे ओव्या तीन तासांत व्हाव्यात. थोडा अल्पोपहार व नंतर गाथाभजन. हे गाथाभजन फार शांत पद्धतीने करायचे असते. इथे गाण्याला कमी महत्त्व असते. अभंग हे खोलवर रुजले पाहिजेत, एवढ्याच प्रमाणात संगीत असते. भजनाच्या अंतिम टप्प्यात विशिष्ट पद्धतीने नृत्य असते याला 'पाऊल्या' असे म्हणतात. यात नृत्याचे अनेक प्रकार आहेत. मृदंगाच्या साक्षीने, टाळांच्या गजरात भगवंताचे नाम चिंतन करीत तालात 'कोट' आदी खेळले जातात. यातच फुगडी, प्रतिस्पर्धात्मक खेळ,खो-खो, घुमरी आदी खेळ रंगतात. जेवण आणि थोड्या विश्रांतीनंतर ज्ञानेश्वरी प्रवचन, भागवत किंवा रामायण इत्यादी निरुपणे होतात. हरिपाठ, जेवण, रात्री कीर्तन, कीर्तनानंतर गावोगावीचे जागर होतात. हे एक आध्यात्मिक शिबिरच असते. सतत संसाराचा विचार करणार मन थोडं तत्त्वज्ञानाकडे वळतं. आपण का जन्माला आलो? आपलं काय कर्तव्य आहे? याची जाण निर्माण होते. कोणत्या सिद्धांतावर आपण विचार करावा, हे या सप्ताहात आपल्याला कळतं. अचानक जीवनाला धोका झाला, तर मनुष्याचा मानसिक तोल जाऊ शकतो. दुःखाची तीव्रता अधिक होऊ शकते. हेच जर संत संगतीतून अगोदर कळलं तर मनुष्य सावध होतो.

नाशिवंत देह जाणार सकळ श्र
आयुष्य खातो काळ सावधान श्रश्र
(स.सं.गा.तु.२५२३)

सज्जनांचा मेळावा असणारा हा सत्संग सर्वांसाठी लाभदायक आहे. गावाची एकता साधणारा, जगण्याचं भान देणारा, मनुष्याला सन्मार्ग दाखविणारा असा हा नाम सप्ताह असतो. महाराष्ट्रात सर्वत्र हा साजरा करतात. सर्व संतांचं अनुमोदन असून, सर्व फडकरी, मठकरी, संस्थानिक हा उपक्रम राबवतात. मराठवाड्यात श्री संत भगवानबाबांनी नारळी सप्ताह प्रारंभ केला. परिसरातील सर्व गावांनी सात दिवस एका गावात एकत्रित यायचं. हे गाव दरवर्षी बदलत असतं. ज्या गावाला हा सप्ताह करायचा असेल, त्यांनी नारळाची मागणी करायची. त्याचं वर्ष ठरवून तो नारळ दिला जातो, म्हणून या अखंड हरिनाम सप्ताहाला नारळी सप्ताह असे म्हणतात. चैत्रशुद्ध त्रयोदशी ही आपल्या नारळी सप्ताहाच्या प्रारंभाची तिथी ठरलेली असते. आज या सप्ताहाचं स्वरूप फार विराट झालं आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून विद्वान व भक्तमंडळी या सप्ताहासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात. त्यांच्या जेवणाची व्यवस्था ज्या गावाने नारळ घेतले आहे ते गांवकरी करीत असतात. त्याला परिसर पूर्ण सहकार्य करत असतो. या सप्ताहाचे हे ९२ वे वर्ष आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यापासून २० किलोमीटर पूर्वेला व श्री क्षेत्र भगवानगडाच्या दक्षिण बाजूला १० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या बडेवाडीमध्ये (बडेवाडी टोलनाक्याजवळ) ३१ मार्च ते ७ एप्रिल दरम्यान हा नारळी सप्ताह संपन्न होत आहे. काल्याच्या दिवशी नामांकित मंडळी उपस्थित राहणार आहेत. आपणही सर्व भाविक निमंत्रित आहात.

फोडिले भांडार धन्याचा हा माल श्र
तेथे मी हमाल भारवाही श्रश्र
(संत तुकाराम गाथा - ३३५)

# सकारात्मक विचार हीच तणाव मुक्तीची गुरुकिल्ली-डॉ.प्रिया घार

## जयक्रांती महाविद्यालयातील युवक-युवती नेतृत्व शिबिरात व्याख्यान

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**

भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या शिबिरांतर्गत तणाव व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संगीता घार या होत्या, तर श्री. पवन घार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. प्रिया घार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास स्त्रीशक्ती स्वयंसिद्धा समितीच्या समन्वयक डॉ. गीता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण आदी मान्यवरांची उपस्थिती होती.




आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. प्रिया घार यांनी सांगितले की, आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत मानसिक तणाव ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. सकारात्मक विचारसरणी अंगीकारल्यास तणावमुक्त जीवन जगणे शक्य होते. त्यांनी विशेषतः युवकांमध्ये वाढत चाललेल्या समस्यांकडे लक्ष वेधले. आई-वडिलांशी कमी होत चाललेला संवाद, शारीरिक कष्टांची कमी झालेली सवय, वाढता नैराश्य व एकाकीपणा, आहारातील बदल आणि सततची धावपळ यामुळे मानसिक संतुलन बिघडत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावर उपाय म्हणून त्यांनी मुक्त संवाद ठेवणे, वेळेचे योग्य नियोजन करणे, सकस व संतुलित आहार घेणे, स्क्रीन टाइम कमी करणे आणि नियमित व्यायाम करणे यासारख्या उपाययोजना अंगीकारण्याचे आवाहन केले. या सवयी आत्मसात केल्यास मानसिक आरोग्य सुदृढ राहून तणावमुक्त जीवन जगता येईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन व यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने विशेष परिश्रम घेतले. शिबिरात सहभागी युवक-युवतींनी या व्याख्यानातून मानसिक आरोग्याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन घेतले.

# न.प.चे ठोस पाऊल: परळीतील मोकाट जनावरांवर नियंत्रणासाठी कोंडवाडा सुरु

## नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या हस्ते झालं उद्घाटन





दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

शहरातील मोकाट जनावरांच्या वाढत्या त्रासावर अखेर प्रभावी उपाय म्हणून परळी नगर परिषदेने समता नगर परिसरात 'कॅटल पाउंड' (कोंडवाडा) सुरू केला असून, या उपक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते सोमवारी उत्साहात पार पडले. शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीच्या सुरळीततेसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शहरातील मुख्य रस्ते आणि चौकांमधील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून, नागरिकांना दिलासा मिळणार आहे. परळी शहर स्वच्छ, सुरक्षित आणि नियोजनबद्ध करण्याच्या दिशेने कोंडवाडा हे आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्री गित्ते, रवींद्र गित्ते,रमेश पवार,अशोक पवार, स्वच्छता निरीक्षक राहुल धनवाडे,काळे, सुनिल आदोडे, राज गायकवाड तसेच नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले की, परळी शहरात मोकाट जनावरांमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत होता. अपघातांची शक्यता वाढत होती. मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा अशी नागरिकांतून मोठी मागणी होती.या पार्श्वभूमीवर नागरिकांची मागणी लक्षात घेऊन नगर परिषदेने कोंडवाडा सुरू करण्याचा निर्णय घेतला. हा उपक्रम शहराच्या शिस्तबद्ध विकासासाठी महत्त्वाचा टप्पा आहे.रस्त्यावर मोकाट फिरणारी जनावरे पकडून थेट कोंडवाड्यात ठेवली जातील आणि संबंधित पशुपालकांकडून दंड आकारला जाईल. त्यामुळे पशुपालकांनी आपली जनावरे मोकाट सोडू नयेत असे आवाहनही त्यांनी केले.

# लोकांची डोकेदुखी वाढणारे तहसील कार्यालयाचे स्थलांतर हे गावाबाहेर न करता शहराच्या मध्यभागी करा-धनाजी जोशी

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील सर्वांत मोठा असलेल्या उपजिल्हा देगलूर येथिल तहसील कार्यालय हे एका बड्या नेत्यांच्या स्वार्थासाठी जनतेची दिशाभूल करुन गावाबाहेरील असलेल्या तालुका कृषी कार्यालयाच्या आवारात घेऊन जाण्याच्या मार्गावर हलचाली सुरू झाल्या असून प्रत्यक्ष लोकप्रतिनिधी व कार्यालयातील उच्च अधिकारी यांनी जागेवर जाऊन पाहणी केल्याचे छायाचित्रे देगलूर वासियांनी पाहिले असुन हे जर तहसील कार्यालय गावाबाहेर गेले तर जनतेचे मोठी डोकेदुखी वाढणार व खिश्याला आर्थिक झळ सुध्दा बसणार,कारण सरकारी काम सहा महिने थांब,या म्हणी प्रमाणे जर एखाद्या व्यक्तीला एका कामासाठी जर तहसील पाच चकरा माराव्या लागल्या तर एक वेळा टो १०० रु म्हणजे ५ वेळा ५०० रुपये लागणार हि रक्कम सामान्य माणसाला परवडणारे नसुन




तेवढे ,लांब (३ कि.मी)चालत जाऊ पण शकत नाही याकरिता देगलूर शहरातील सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी तहसीलदार भरत सुर्यवंशी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असून हि मागणी रास्त आहे.कारण तहसील कार्यालय हे जर शहराच्या मध्यभागी ठेवले तर ,नागरिकांना उपजिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस स्टेशन, पोस्ट ऑफिस,न्यायालय,हि कार्यालय हाकेच्या अंतरावर राहतील व नागरिकांना हेलपाटे होणार नाही याकरिता देगलूरचे तहसील कार्यालय हे गावाबाहेर स्थलांतर न करता शहराच्या मध्यभागी उभारण्यात यावे, अन्यथा देगलूरचे सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांच्या वतीने कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे..

# खा.चव्हाणसाहेब यांनी माहूर येथे श्री दत्तप्रभू,रेणुका मातेचे दर्शन घेतले

दैनिक वादळ वार्ता
**श्रीक्षेत्र माहूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी माहूर गडावरील श्री दत्तशिखर संस्थान गाठून श्री दत्तप्रभूचे दर्शन घेत महंत श्री प पू मधुसूदनजी भारती महाराज यांचे दर्शन घेऊन तब्येतीची विचारपूस करत श्री दत्तप्रभू श्री रेणुका माता चरणी जगात सुख शांती समृद्धी नांदू दे अशी प्रार्थना केली.

यावेळी श्री दत्त शिखर संस्थान येथे श्याम भारती महाराज यांनी अशोकराव चव्हाण यांचा सत्कार केला तर श्री रेणुका देवी संस्थान येथे विश्वस्व तथा पुजारी चंद्रकांत भोपी यांनी सत्कार मातेचा महाप्रसाद दिला यावेळी श्री दत्त शिखर संस्थान सह रेणुका माता संस्थान



वर सुरू असलेल्या विकास कामांचा त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विशाल चोपडे यावेळी माजी मुख्यमंत्री अशोकराव यांचे सोबत माजी आ.अमरनाथ राजुरकर भाजपाचे ज्येष्ठ नेते गोविंदराव पाटील नागेलीकर महापौर कविताताई मुळे ज्येष्ठ नेते नामदेवराव केशवे प्रवीण साले संजय देशमुख लहानकर निलेश पावडे किशोर भवरे नगराध्यक्ष फिरोज दोसानी भाजपाचे तालुका अध्यक्ष निळू भाऊ मस्के माजी नगराध्यक्ष प्रा राजेंद्र केशवे डॉ निरंजन केशवे संजय भाऊ राठोड अनिल बाघमारे कांतराव घोडेकर नगरसेवक गोपू भाऊ महामुने हाओ उस्मान खान पठाण किशोर भाऊ जगत विनायक मुसळे अपील बेलखोडे विजय आमले नंदकुमार जोशी सर अजय पवार यांचे सह एमआयएमचे युवा नेते इरशाद भाई मकरानी यांनी भेट घेऊन सत्कार केला यावेळी नातंह कैलास जेठे पानी देविदास चोपडे सय्यद रहेमत आली दिलीप मुनगिलवार संजय बनसोडे रामकिसन केंद्र अधिकारी कर्मचारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देगलूर तालुक्यातील रस्त्यासाठी युवासेनेचे उपमुख्यमंत्री यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब रविवारी नांदेड दौऱ्यावर आले असता, युवासेना जिल्हाध्यक्ष नामदेव पाटील देगावकर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत निवेदन सादर केले.बल्लूर फाटा ते मानूर (राज्यमार्ग १४५) तसेच देगलूर ते हाणेगाव (औराद मार्ग) आणि हाणेगाव ते शिळवणी या रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या रस्त्यांचे नव्याने मजबूत व टिकाऊ बांधकाम करण्यात यावे तसेच डांबरीकरण किंवा सिमेंट कॉंक्रीट रस्ता करून सुरक्षित प्रवासाची सोय करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.तसेच या कामांसाठी आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करून देऊन निश्चित वेळेत काम पूर्ण करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली. या रस्त्यांच्या कामामुळे परिसरातील हजारो नागरिकांना दिलासा मिळणार असून त्यांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल होईल.युवासेनेच्या वतीने सातत्याने विविध सामाजिक व सार्वजनिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले जात आहे.

# औसा तालुक्यात आशा दिवस उत्साहात साजरा

## आमदार मा.अभिमन्यू पवार यांच्या हस्ते आशा स्वयंसेविकांचा गौरव

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा (दि. २७ मार्च २०२६) रोजी आशा दिवस साजरा करण्यात आला गावागावात आईसारखी माया आणि सेवाभावाने आरोग्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या आशा स्वयंसेविकांच्या कार्याला सलाम करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, औसा यांच्या वतीने 'आशा दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आशा ताईंच्या निस्वार्थ सेवेचा गौरव करून त्यांचा सन्मान करण्यात आला.गर्भवती माता, नवजात बालकांची काळजी, लसीकरण, कुटुंब नियोजन व जनजागृती अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडत आशा




कार्यकर्त्या समाजाच्या आरोग्य व्यवस्थेचा भक्कम आधार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.कार्यक्रमाला आमदार मा. श्री अभिमन्यू पवार, सभापती थोरात मॅडम, उपसभापती मा. श्री अमोल पाटील, तहसीलदार श्री घनश्याम अडसूळ, गट विकास अधिकारी श्री अनंत कुमार मिरगणे, ए.डी.एच.ओ. डॉ. भागवत व जिल्हा समूह संघटक डावरी मॅडम उपस्थित होते. मान्यवरांनी आशा ताईंच्या कार्याचे कौतुक करून त्यांना प्रेरणा दिली.यावेळी उत्कृष्ट काम करणाऱ्या आशा स्वयंसेविकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरोग्य सहाय्यक श्री हिप्पर्गेकर यांनी केले. प्रस्तावना तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर यांनी मांडली, तर आभार प्रदर्शन श्री तालुका समूह संघटक देशमुख यांनी केले.

# डिझेल,देशीदारु व कार सह ४ लाख २२ हजाराचा मुद्देमाल जप्त
# सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम यांच्या पथकाची धडाकेबाज कारवाई

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जीवाचीवाडी ते तुकूचीवाडी या रस्त्या वरून सोमवार दि.३० मार्च रोजी मध्यरात्री साडे बारा वाजण्याच्या दरम्यान चार चाकी कार मधून ९० मिलीच्या ३०० देशी दारूच्या बाटल्याचे तीन बॉक्स,१२५ लिटर अवैध डिझेलची वाहतूक करणारी कार मिळून एकूण ४ लाख २२ हजार ४५० रुपयाचा मुद्देमाल केज पोलीस उप विभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने छापा मारून जप्त करून,आरोपी वाहन चालक अनंत नारायण चौरे रा.जीवाची वाडी याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सोमवारी रात्री उशिरा केज येथून तुकूचीवाडी येथे कार क्रमांक एम एच १२/ केवाय २१४८ मधून देशी दारूच्या बाटल्या व अवैध डिझेलची वाहतूक होत असल्याची माहिती, सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांना मिळाल्या वरून त्यांनी त्यांचे पथक पाठवून कारवाईचेआदेश दिले.जीवाचीवाडी ते तुकूचीवाडी या रस्त्यावर सोमवारी रात्री साडे बारा वाजण्याच्या दरम्यान जाणाऱ्या कार क्रमांक



एम एच १२ / २१४८ ची झडती घेतली असता या कारमध्ये ११ हजार ५०० रुपयाचे १२५ लिटर अवैध डिझेलचा साठा, १० हजार ९५०रुपयाच्या ९० मिलीच्या बॉबी या देशी दारूच्या ३०० बाटल्याचे ३ बॉक्स व कार मिळून एकूण ४ लाख २२ हजार ४५० रुपयाचा मुद्देमाल या कारवाईत जप्त करण्यात आला.ही कारवाई केज पोलीस उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम,अमिरोद्दीन इनामदार,जावेद कराडकर,जमादार विकास चोपणे, बालासाहेब डापकर, पोलीस हवालदार राजू गुंजाळ,चंद्रकांत काळकुटे,अनिल मंदे, तांबारे,मुंडे,पोलीस अंमलदार टकले महिला पोलीस जाधव,व भालेराव यांनी केली. याप्रकरणी जमादार बालासाहेब डापकर यांच्या फिर्यादीवरून अनंत नारायण चौरे रा. जीवाचीवाडी याच्या विरुद्ध अवैध डिझेलचा साठा केल्याप्रकरणी व विना परवाना देशी दारूच्या बाटल्यांचा साठा केल्या प्रकरणी केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली चालु आहे.

## देवगांवयेथील रेणूका देवीयात्रेच गुरुवार पासुन आयोजन गावातील पालखी मिरवणूकीने यात्रेची होणार सांगता

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील देवगांवयेथील रेणुका देवीचीयात्रादरवर्षी
प्रमाणे या वर्षीही गुरुवार दि.२ एप्रिल पासुन सुरु होत आहे.यामध्ये गुरुवार रोजीसकाळी आठ वाजता देवीचा गाढा ओढणे,सोबत पालखी मिरवणुक कार्यक्रम व शुक्रवारी संध्याकाळी (छबिना) गावातील पालखी मिरवणूकीने यात्रेची सांगता होणार असल्याने या यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येंने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती रेणुका देवी संस्थानचे अध्यक्ष रमाकांत बापू मुंडे सह यात्रा कमेटी सदस्यांनी व गावकऱ्यांनी केली आहे.



केज तालुक्यातील देवगांव येथेगावच्या उत्तर दिशेला दोन किलो मीटर अंतरावर तिर्थक्षेत्र रेणुका मातादेवीचे सुंदर मंदिर आहे. गावकऱ्यांचे व पंचक्रोशीतील गावांचे ग्रामदैवत असलेल्या या रेणुकादेवीची यात्रा दरवर्षीचैत्र महीन्यातील पौर्णीमेच्या दिवशी भरते दरवर्षीप्रमाणे या वर्षीही दि.१ एप्रिल बुधवार रोजी गावातील सुवासिनी आपल्या सोयीनुसार देवी मंदीर परिसरात पंगत घालतील.दि.२ एप्रिल गुरुवार रोजी सकाळी गावात हनुमान जयंती उत्सव साजरा करुन लगेच सकाळी आठ वाजता रेणुका देवीचा गाढा मंदिराकडे निघेल सोबत देवीची पालखी
देवगांव येथून वाजत गाजत मंदीराकडे मार्गस्थ होणार आहे.हा पालखी सोहळा पाहण्यासाठी पंचक्रोशील मंडळी व महीला मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.दुसऱ्या दिवशी शुक्रवारी दुपारी चार वाजता रेणुका देवी मंदिर परिसरात महा प्रसादाची मोठी पंगत होणार व त्याच दिवशी संध्याकाळी गावात देवीचा (छबिना) पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.तरी या यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येंने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती रेणुका देवी संस्थानचे अध्यक्ष रमाकांत बापू मुंडे सह यात्रा कमेटीचे सदस्य व गावकऱ्यांनी केली आहे.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात महावीर जयंती,जागतिक रंगभुमी दिन,श्रीरामनवमी सांस्कृतीक कार्यक्रमाने संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दि. ३१ मार्च २०२६ रोजी भगवान महावीर जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम भगवान महावीर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.त्यानंतर अहिंसा परमो धर्म या विषयावर ग्रंथालयाचे संस्थापक, जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाजसेवक,महाराष्ट्रा तील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांचेव्याख्यान झाले.त्यानंतर घेण्यात आलेल्या परिसंवादात माजी सरपंच रामराजे गायकवाड,एस.के.वैरागे, ज्ञानेश्वरी पुंड,आनंद भैय्या गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.त्यानंतर चर्चासत्रात वेदिका गायकवाड,बालाजी




टिंगरे,श्रद्धा गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप ए.बी. गायकवाड यांनी केला. दि.२७ मार्च २०२६ रोजी जागतिक रंगभूमी दिन एकपात्री नाटिका सादरीकरण करून साजरा करण्यात आला. वेदिका गायकवाड,श्रद्धा गायकवाड यांनी एकपात्री नाटिकेचे सुरेख सादरीकरण केले.दि.२६ मार्च २०२६ रोजी श्रीराम नवमी साजरी करण्यात आली.सर्वप्रथम श्रीराम प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

## तळोधात उसळला जनसागर! अहिंसेच्या जयघोषाने अवघे शहर झाले मंत्रमुग्ध; नक्की काय घडले?

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा शहरात दिनांक ३१ मार्च रोजी भगवान महावीर जयंतीचे औचित्य साधून जैन समाजाच्या वतीने भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. शहरातून निघालेल्या भगवान महावीरांच्या भव्य शोभायात्रेने अवघ्या तळोदावासीयांचे लक्ष वेधून घेतले. 'अहिंसा परमो धर्म' आणि 'जगा आणि जगू द्या' या संदेशांनी अवघे शहर भक्तीमय झाले होते.

सकाळी ठीक १० वाजता शहरातील समाधान चौकातून या शोभायात्रेचा प्रारंभ झाला. यावेळी जैन बांधव आणि भगिनी पारंपरिक वेशभूषेत मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. विशेषतः महिलांचा उत्साह वाखणण्याजोगा होता. भगवान महावीरांच्या सुशोभित प्रतिमेची ही रथ यात्रा समाधान चौकाकडून बिरसा मुंडा चौकाकडे मार्गस्थ



झाली.या शोभायात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे त्यातील भजनी मंडळी. भजनांच्या माध्यमातून भगवान महावीरांच्या विचारांचा आणि शांततेचा प्रसार करण्यात आला. सुमधुर भजनांमुळे मार्गावर उपस्थित असलेल्या नागरिकांना या भक्तीरसात मंत्रमुग्ध होताना पाहिले गेले. भजनांच्या तालावर चालणारी ही शांततामय रॅली शहराच्या मुख्य मार्गावरून काढण्यात आली.भगवान महावीरांनी जगाला शांती आणि अहिंसेचा मार्ग दाखवला. त्याच तत्त्वाचे पालन करत ही शोभायात्रा अत्यंत शिस्तबद्ध आणि शांततेच्या मार्गाने मार्गक्रमण करत होती. शहराच्या विविध भागांतून जात असताना अनेक भाविकांनी जागोजागी भगवान महावीरांच्या प्रतिमेचे मनोभावे दर्शन घेतले.

थोडक्यात सांगायचे तर,आजची ही शोभायात्रा केवळ एक सण म्हणून नाही, तर शांती आणि संयमाचा एक आदर्श म्हणून तळोदा शहरात चर्चेचा विषय ठरली आहे.

## झोका खेळताना खुरू कलंडल्याने ९ वर्षीय चिमुकलीचा गळफास लागुन दुर्दैवी मृत्यू

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । उफाडे मच्छिंद्र**

माजलगाव शहरातील सन्मित्र कॉलनी, खंडोबा मैदान परिसरात एक अत्यंत हृदयद्रावक आणि दुर्दैवी घटना घडली आहे. घरात झोका खेळत असताना दोरी गळ्याला अडकून एका ९ वर्षीय बालिकेचा मृत्यू झाला आहे. वृंदा समीर रुद्रवार असे या मृत मुलीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी महावीर जयंतीनिमित्त शाळेला सुट्टी होती. वृंदा आपल्या लहान बहिणीसोबत घराच्या वरच्या मजल्यावर खेळत होती. खेळता खेळता ती खुर्चीवर चढून झोका पकडण्याचा प्रयत्न करत होती. त्याच वेळी अचानक खुर्ची कलंडली



आणि तोल गेल्याने झोक्याची दोरी तिच्या गळ्याभोवती अडकली. यामुळे तिला गळफास बसला आणि या अपघातात तिचा जागीच मृत्यू झाला.वृंदा जेवण्यासाठी खाली का आली नाही, हे पाहण्यासाठी तिची आई वरच्या मजल्यावर गेली असता हा धक्कादायक प्रकार समोर आला. आपल्या मुलीला अशा अवस्थेत पाहून आईने मोठा टाहो फोडला. आवाजावरून कुटुंबातील इतर सदस्य धावत आले आणि त्यांनी तातडीने वृंदाला रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. तोपर्यंत खूप उशीर झाला होता.

वृंदा ही ईगलवूड इंग्लिश स्कूलमध्ये दुसरीच्या वर्गात शिकत होती. तिच्या अशा अचानक जाण्याने रुद्रवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे संपूर्ण माजलगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.

## नंदुरबारच्या बळीराजाला गारपिटीचा तडाखा डॉक्टर हिना गावित बांधावर,तर आमदार विजयकुमार गावित यांचा रुग्णालयातूनच शेतकऱ्यांना धीर

### प्रशासनाला 'सरसकट' पंचनाम्यांचे आदेश; नुकसान भरपाईसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार तालुक्यातील शनिमांडळ, तलवाडे, इंद्रीहट्टी परिसरात निसर्गाचा कोप झाला असून वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार गारपिटीने शेतीचे कंबरडे मोडले आहे. ऐन काढणीच्या हंगामात हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने बळीराजा संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली, तर प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात असूनही आमदार डॉक्टर विजयकुमार गावित यांनी व्हिडिओ कॉलद्वारे शेतकऱ्यांशी संवाद साधत आपले कर्तव्य बजावले.

शनिमांडळ आणि परिसरातील गावांमध्ये झालेल्या गारपिटीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. त्यासोबतच काढणीला आलेला मका, गहू आणि फळबागांपैकी पपईच्या बागा भुईसपाट झाल्या आहेत. वर्षाभराची मेहनत आणि लावलेले भांडवल निसर्गाने हिरावून नेल्याने शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडला आहे.

नुकसानीची माहिती मिळताच माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. चिखल तुडवत त्यांनी प्रत्यक्ष



पिकांच्या नुकसानीची पाहणी केली आणि उपस्थित अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. शासनाकडून जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. या संदर्भात स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून तातडीने मदतीची मागणी करणार आहे, असे आश्वासन डॉक्टर हिना गावित यांनी यावेळी दिले.

माजी मंत्री आमदार डॉक्टर विजयकुमार गावित हे सध्या मुंबईतील रुग्णालयात उपचार घेत आहेत. मात्र, आपल्या मतदारसंघातील शेतकरी अडचणीत असल्याचे समजताच त्यांनी रुग्णालयातूनच व्हिडिओ कॉलद्वारे थेट शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दात सूचना दिल्या की, कोणतीही तांत्रिक अडचण न काढता जागेवरच 'सरसकट पंचनामे' करण्यात यावेत, जेणेकरून एकही गरजू शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही.

या पाहणी दौऱ्यात प्रशासकीय गांभीर्य दिसून आले. यावेळी संसदरत्न डॉक्टर हिना गावित यांच्यासोबत कृषी व महसूल विभागाचे अधिकारी, भाजप तालुकाध्यक्ष दीपक पाटील, शनिमांडळचे सरपंच विनायक पाटील, दिलीप पाटील, मुन्ना पाटील, शांतीलाल पाटील यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सातपुड्याचा 'कल्पवृक्ष' महु ठरतोय आदिवासींच्या जगण्याचा आधार; भर उन्हाळ्यात रोजगाराची सुवर्णसंधी!

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रवींद्र वळवी**

सातपुड्याच्या दुर्गम डोंगररांगांमध्ये सध्या कडक उन्हाचा कडाका जाणवत असला, तरी निसर्गाच्या कुशीत मात्र चैतन्याचा दरवळ पसरला आहे. सातपुड्याचा 'कल्पवृक्ष' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महुच्या (मोह) फुलांचा हंगाम सुरू झाला असून, हा वृक्ष आदिवासी बांधवांसाठी खऱ्या अर्थाने 'संकटमोचक' ठरत आहे. उन्हाळ्याच्या दिवसात शेतीची कामे कमी असताना, महुच्या फुलांनी आदिवासी कुटुंबांना हक्काचा रोजगार उपलब्ध करून दिला आहे.चैत्र पौर्णिमेपासून महुची झाडे बहरण्यास सुरुवात झाली आहे. साधारण १५ ते २० दिवस चालणाऱ्या या हंगामात पहाटेपासूनच आदिवासी बांधव आबालवृद्धांसह रानावनात दाखल होताना दिसत आहेत. जमिनीवर पडलेली महुची फुले वेचण्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्य उन्हाची पर्वा न करता मग्न असतात. एका झाडापासून दिवसाला साधारण १२ ते १५ किलो फुले मिळत असून, स्थानिक बाजारपेठेत व्यापाऱ्यांकडून ४५ ते ५० रुपये प्रति किलो दराने ही फुले खरेदी केली जात आहेत.

महुच्या फुलांकडे अनेकदा केवळ मद्यनिर्मितीचे साधन म्हणून पाहिले जाते, परंतु हा गैरसमज मोडीत काढणारे अनेक औषधी गुणधर्म समोर आले आहेत. महुच्या फुलांमध्ये कॅल्शियम आणि जीवनसत्त्वांचा



मोठा साठा असून, गर्भवती व स्तनदा मातांसाठी हे एक उत्तम नैसर्गिक पोषक अन्न आहे.

आरोग्यदायी भाकरी, उसळ आणि चटणी.
महुच्या बियांपासून (चिंचोडे) काढलेले तेल स्वयंपाकासाठी अत्यंत उपयुक्त.

सातपुड्यातील वृद्ध नागरिक सांगतात की, १९७१ च्या भीषण दुष्काळात जेव्हा अन्नाचा मोठा तुटवडा होता, तेव्हा याच महुच्या फुलांच्या भाजीने आदिवासी बांधवांचे प्राण वाचवले होते. आजही हा वृक्ष केवळ आर्थिक उत्पन्नाचे साधन नसून सातपुड्याच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

महुच्या फुलांपासून अनेक खाद्यपदार्थ बनवता येतात. जर या भागात महु प्रक्रिया उद्योग सुरू झाला, तर आदिवासी बांधवांना केवळ कच्चा माल विकण्याची गरज पडणार नाही. त्यापासून मूल्यवर्धित उत्पादने तयार झाल्यास आदिवासींच्या उत्पन्नात मोठी वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावेल. असे डीरा कविराज उमटी (तालुका अक्कलकुवा) हे सांगतात.राज्य सरकारने महु फुलांवरील निर्बंध हटवल्याने आता आदिवासी बांधवांना मोकळा श्वास घेता येत आहे. सातपुड्यातील हा मौल्यवान वारसा जपण्यासाठी आणि त्याद्वारे आर्थिक क्रांती घडवण्यासाठी महुच्या वृक्षांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. हा कल्पवृक्ष सातपुड्यातील बांधवांच्या कष्टाला आता सोन्याची झळाळी मिळवून देणार, यात शंका नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077